Estd. 1962
NAAC'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

परिपत्रक

**विषय: करोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेबाबत**
**संदर्भ :१. विभागीय सहसंचालक (उ.शि.), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे दि. १५ मार्च,२०२० रोजीचे पत्र**
**२. मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर जिल्हा यांचे दि. १३.३.२०२० रोजीचे आदेश**

उपरोक्त संदर्भाधिन पत्रे सोबत जोडली आहेत त्याचे अवलोकन करावे. त्याअन्वये आपणास कळविण्यात येते की, शासनाने कोरोना (कोव्हिड-१९) विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दि.१३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

कोरोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच, महाविद्यालये व आयुक्त व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीमधील तरतुदीनुसार दि. ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत संदर्भाधिन पत्रान्वये सूचित करण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त संदर्भित पत्रांच्या अनुषंगाने आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, उपरोक्त सुचना विचारात घेऊन कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्हयातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालये दि. ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्यात यावीत. विद्यापीठाच्या प्रात्यक्षिके व परीक्षा विहित वेळापत्रकानुसार घेणे, त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाहीत यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्यात यावी. तसेच याबाबत शासनाकडून सुधारित आदेश प्राप्त झाल्यास सर्व संबंधितांना त्याबाबत कळविण्यात येईल.

**(डॉ. विलास द. नांदवडेकर)**
कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना/** 793

**दि.** 15 MAR 2020

**प्रति,**

१) मा. प्राचार्य/संचालक, सर्व सलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
२) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, रेक्टर्स, सपोर्ट सर्व्हिसेस
३) सर्व प्रशासकीय विभागप्रमुख.
४) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
५) सुरक्षा विभागप्रमुख
६) सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर संघटना
७) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

# महाराष्ट्र शासन
## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर -४१६ ००४
E-mail: jdhekop@rediffmail.com

फोन क्र. : (०२३१) २५३५४००, २५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००


जा.क्र. : विसस/उशि/कोवि/२०२०/1130 दिनांक :- १५/०३/२०२०.

प्रति,

१. मा. प्राचार्य, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर,
२. प्र. प्राचार्य, श्री. म. ता. शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर,
३. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,
४. कुलसचिव, पदमश्री डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ, कोल्हापूर,
५. कुलसचिव, संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर,
६. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित,
कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र व विधी महाविद्यालये,
कोल्हापूर / सांगली / सातारा.

विषय :- राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत...

संदर्भ :- १. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/कोरोना/मवि-१/२०२०/३७७८, दि.१४/३/२०२०.
२. शासन पत्र क्र. संकिर्ण-२०२०/(सं.क्र.)/(११४/२०)/विशि-१, दि.१४/३/२०२०.

उपरोक्त संदर्भाधिन पत्रे सोबत जोडलेली आहेत, त्याचे अवलोकन करावे. त्यान्वये आपणांस कळविण्यात येते की, शासनाने करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि. १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदींनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच, महाविद्यालय व आयुक्त व व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदींनुसार दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत संदर्भाधिन पत्रान्वये सूचित करण्यात आलेल आहे.

तथापि, या सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील इयत्ता १० वी व १२ वी च्या तसेच, विश्वविद्यालयांच्या प्रात्यक्षिके व परीक्षा विहित वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आला आहे. आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाहीत यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याच्या सूचना देखील सार्वजनिक आरोग्य विभागाचे पत्र दि.१४/३/२०२० नुसार देण्यात आलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त सूचना विचारात घेऊन कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्हयातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे आणि शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित / मॉडेल डिग्री महाविद्यालये दि. ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्यात यावीत. विद्यापीठाच्या प्रात्यक्षिके व परीक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेणे, त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाहीत यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्यात यावी.

15/3/20

विभागीय सहसंचालक, (उ.शि.),
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर, करिता

प्रत :- १. मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना माहितीस्तव सविनय सादर,
२. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर,

Scanned by CamScanner

## जाहीर नोटीस


| | | |
|---|---|---|
| सत्यमेव जयते | जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण<br>जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर<br>स्वराज्य भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर - ४१६००२<br>दुरध्वनी क्रमांक : 0231-2659232 टोल फ्री (1077)<br>Email: rainkolhapur@gmail.com | |


जा.क्र. आधोव्यनिक/कोरोना विषाणू/ ३०/2020, दिनांक :-13/03/2020.

वाचले

1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, कलम 34 मधील पोट कलम ग (c) व ड (m).
2. महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 43.
3. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897.
4. दिनांक 12 मार्च 2020 रोजीचे जिल्हा आपत्तीव्यवस्थापन प्राधिकरण बैठकीमध्ये घेणेत आलेल्या निर्णयांचे इतिवृत्त.

विषय :- कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखणे करीता विविध गर्दीच्या कार्यक्रमांवर बंदी घालणे बाबत...

### आदेश

ज्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी , आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना या विषाणूचे संसर्ग बाधीत रुग्ण आढळत आहेत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाव्दारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहेत . असे प्रवासी कोल्हापूर जिल्हयामध्येही परदेश प्रवास करुन आलेले आहेत व बरेच प्रवासी परतण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तत्काळ नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचे संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. अशा प्रवाशांमुळे कोरोना विषाणूचा संसर्ग जिल्हयात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव गर्दीच्या ठिकाणी जाणे, वास्तव्य करणे, इत्यादी बाबी टाळणे अत्यावश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे कोरोना विषाणूच्या प्रसाराचे माध्यम पहाता, सदर विषाणूची लागण एका संक्रमीत रुग्णाकडून अन्य व्यक्तीस/इसमास त्याच्या संपर्कात आलेने होण्याची शक्यता विचारात घेता, मी दौलत देसाई , अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हादंडाधिकारी कोल्हापूर, जिल्हयात आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, कलम 34 मधील पोट कलम ग (c) व ड (m) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा 1951 चे कलम 43 अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशाव्दारे मोठया प्रमाणात लोकांचा समुह एकत्र जमू न देण्यासाठी, संपूर्ण कोल्हापूर जिल्हयामध्ये घेणेत येणा-या सभा, मेळावे, सामाजिक कार्यक्रम, जत्रा, यात्रा, उरुस, धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रम, क्रिडास्पर्धा, इत्यादीवर आज दिनांक 14 मार्च 2020 ते दिनांक 31 मार्च 2020 पर्यंत बंदी लागू करीत आहे. जत्रा, यात्रा, उरुस इ. धार्मिक/सामाजिक कार्यक्रमात पुजारी किंवा धर्मगुरु इ. ना विधिवत पुजा करण्यास किंवा परंपरेने करावयाचे कार्यक्रम मोजक्या लोकांचे उपस्थितीत करण्यास

Scanned with CamScanner

बंदी असणार नाही. तसेच खाजगी कार्यक्रम फक्त कौटुंबीक स्वरुपात करण्यास बंदी असणार नाही. परंतु या दोन्ही बाबतीत सर्व वैद्यकिय सुरक्षा पाळणे बंधनकारक राहील. यासाठी संबंधित तालुक्याचे तहसिलदार किंवा मुख्याधिकारी, नगर पालिका किंवा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांची त्यांचे कार्यक्षेत्रातील अशा कार्यक्रमासाठी लेखी पुर्व परवानगी घ्यावी लागेल.

सर्व शासकीय यंत्रणांना ही निर्देशीत करीत आहे की, अशाप्रकारे सभा, मेळावे, सामाजिक कार्यक्रम, जत्रा, यात्रा, उरुस, धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रम, क्रिडास्पर्धा, इत्यादीच्या आयोजना संदर्भात कोणतीही परवानगी त्यांच्या स्तरावर देण्यात येऊ नये.

त्याचप्रमाणे जिल्हयातील सर्व तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी व मुख्याधिकारी नगरपालिका/परिषद व आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांना त्यांचे-त्यांचे कार्यक्षेत्रात होणाऱ्या अशा कार्यक्रमांना प्रतिबंध करण्यासाठी तसेच फक्त विधिवत पुजा किंवा कौटुंबीक कार्यक्रमांना परवानगी देण्यासाठी प्राधिकृत करुन तसे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

या आदेशाचे किंवा संबंधित तहसिलदार किंवा मुख्याधिकारी किंवा आयुक्त यांनी दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करुन अश्या गर्दीचे कार्यक्रम आयोजित केल्यास संबंधित संयोजकाविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 कलम 51 अन्वये तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 43 अन्वये कारवाई करण्यात येईल. यासाठी संबंधीत सर्व तहसिलदार, मुख्याधिकारी व आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

(दौलत देसाई)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
कोल्हापूर

Scanned with CamScanner